**<u>फिर्यादी पक्ष साक्षीदार क्र.१ मिलींद पांडुरंग ठाकूर यांचा पुढील सरतपास</u>**
**<u>फिर्यादी पक्षातर्फे वकील श्री.के.के.मराठे यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

९. मी आज रोजी नि.क्र.४५ अ.क्र.१ ते ७ येथे अनुक्रमे दि.१२/१२/२०२१ ची पावती क्र.४०९ चे डिलीवरी चलन, दि.२६/१२/२०२१ ची पावती क्र.४२२ चे डिलीवरी चलन, दि.१७/०१/२०२२ ची पावती क्र.४६३ चे डिलीवरी चलन, दि.२०/०१/२०२२ ची पावती क्र.४७९ चे डिलीवरी चलन,दि.२४/०१/२०२२ ची पावती क्र.४८८ चे डिलीवरी चलन, दि.०३/०२/२०२२ ची पावती क्र.५०९ चे डिलीवरी चलन, दि.१४/०२/२०२२ ची पावती क्र.५५८ चे डिलीवरी चलन यांची पडताळीत प्रत प्रस्तुत प्रकरणी हजर केली आहेत. सदर अ.क्र.१ ते ७ येथे असणाऱ्या डिलीवरी चलनावर विलास तुकाराम गोळम आरोपी यांची सही आहे. सदर सही माझ्या समक्ष प्रत्येकवेळी जेव्हा माझया कडून माल घेतला तेव्हा केलेली आहे. अ.क्र.१ ते ७ येथे असणाऱ्या डिलीवरी चलनावरील आरोपीची स्वाक्षरी वगळता हस्ताक्षर माझे स्वत:चे आहे. अ.क्र.१ ते ७ येथे असणाऱ्या डिलीवरी चलनातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र.५१ ते ५७** देण्यात येते. आमच्याकडून एखादया व्यक्तीने माल उधारीवर घेतला असल्यास त्याबाबत प्रस्तुत प्रकरणी हजर केल्याप्रमाणे डिलीवरी चलन देतो.

सरतपास पूर्ण.

**आरोपीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब....**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

(श्रीकांत एस.पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि.२८/०७/२०२५